# कृपया प्रसिध्दीसाठी

कला अकादमी आयोजित मराठी 'ब' गट नाटय स्पर्धा फेब्रुवारी महिन्यात रविंद्र भवन, साखळी येथे आयोजित करण्यात आली आहे. सदर स्पर्धेत सहभागी होण्यासाठी प्रवेशिका स्वीकारण्याची अंतिम मुदत १९ जानेवारी २०२१ असून स्पर्धेची नियमावली व निर्धारीत नमून्यातील प्रवेशिका कला अकादमीच्या कार्यक्रम व विकास विभागात विनामूल्य उपलब्ध आहेत.

प्रवेशिका सादर करतेवेळी संस्थेचे नाव, रजिस्ट्रेशन क्रमांक, नोंदणी करण्याचा दिवस, संस्था नोंदणी कायद्याच्या सुधारित नियमानुसार सर्व नोंदणीकृत संस्थानी आपल्या संस्थांचे नोंदणीकरण करणे बंधनकारक असल्याकारणाने सदरचा तपशील , नाटकाचे नाव, एवढीच माहिती पुरविणे आवश्यक आहे.स्पर्धक संस्थेला आपल्या प्रवेशिकेसोबत रू. ५००/- (रूपये पाचशे मात्र) प्रवेशशुल्क तसेच रू. ५०००/- (रूपये पाच हजार मात्र) रोख अनामत रक्कम कला अकादमीकडे भरणा करावी लागेल. कलाकारांच्या नामावलीच्या चार प्रती व संहितेची एक प्रत स्पर्धक संस्थेला प्रयोगाच्या दिवशी कला अकादमीकडे द्यावी लागेल. सदर स्पर्धेचा अनुक्रम सहभागी संस्थांच्या प्रतिनिधीसमक्ष दि. १९ जानेवारी २०२१ रोजी सायं. ४.३० वाजता ठरविण्यात येणार आहे.